Publication: Sakal
Date: 4/5/2019
Page: 3
Column: 3-8

सकाळ
शनिवार, ४ मे २०१९

# झामजड पाड्यावर ७० वर्षांनी पोहचली वीज

## पन्नास कुटुंबीयांची प्रतीक्षा अखेर पूर्ण; दहा वर्षांच्या प्रयत्नांना यश



सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ३ : देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईजवळील गोराई येथील झामजड पाड्यात तब्बल ७० वर्षांनंतर वीज पोहचली आहे. वीज मिळावी यासाठी दहा वर्षांपासून अथक प्रयत्न करणाऱ्या रहिवाशांची गुरुवारची (ता. २) रात्र अखेर आनंदाच्या प्रकाशात न्हाऊन निघाली. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) या वीजपुरवठा करणाऱ्या कंपनीने झामजड पाड्यात वीज पोहचविण्याचे काम आठवड्यात पूर्ण केले आहे.

गोराई येथील झामजड पाड्यामध्ये ५० कुटुंबे वास्तव्य करत आहेत. येथील रहिवासी वीज मिळावी यासाठी अनेक वर्षांपासून प्रयत्न करत होते; परंतु केवळ ५० कुटुंबांसाठी वीज देण्यासाठी वीज कंपन्या दुर्लक्ष करत होत्या. अखेर एईएमएल कंपनीने रहिवाशांना वीज पुरविण्यासाठी आठवडाभर मेहनत घेत पहिल्यांदा इथे विजेचा दिवा सुरू केला, तेव्हा ग्रामस्थांनी एकत्र येत नाचत गात आपला आनंद साजरा केला.

### एईएमएलचा पुढाकार

**एईएमएलने गोराईतील झामजड पाडा येथील विजेचे काम पूर्ण केले आहे. 'गावातील कुटुंबांनी घेतलेल्या प्रयत्नांमुळे आम्ही हे काम पूर्ण करू शकलो. आपली घरे प्रकाशाने उजळलेली पाहताना या ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आलेली झळाळी पाहणे हा अत्यंत समाधानकारक अनुभव होता. एक ग्राहककेंद्री संस्था म्हणून आमच्या सर्व ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा मिळेल, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करू,' असे एईएमएलच्या प्रवक्त्याने सांगितले.**

एईएमएलने येथे वायर टाकण्याचे काम सुरू केल्यापासून आपली घरेही प्रकाशात उजळून निघण्याची प्रतीक्षा करणारी लहान मुलेही मोठ्यांइतकीच आनंदली होती.

शहरापासून अवघ्या २० किलोमीटर अंतरावर एका छोट्या डोंगरावर असलेला झामजड पाडा मागील १० वर्षे प्रयत्नशील होता. विजेचे काम पूर्ण झाल्यामुळे आता हे गाव शहराच्या अधिक नजीक आले आहे. आता येथील मुले रात्रीही दिव्याच्या प्रकाशात अभ्यास करू शकतील आणि कामावर जाणाऱ्यांना कोणतीही भीती न बाळगता रात्री घराबाहेर पडता येईल. तसेच या गावांमध्ये वैद्यकीय सेवा पुरवणेही सोपे होणार आहे. वीज आल्याने विकासाचा मार्ग खुला झाला आहे. झामजड पाड्यातील ग्रामस्थांसाठी आता अनेक संधी निर्माण होणार आहेत.